# पुरुषप्रधानतेचा उदय : मारिआ मिएसची मांडणी

स्त्रीमुक्ती चळवळीला सुरुवात झाली आणि स्त्रीदास्याचे मूळ कशामध्ये आहे याचा शोध घेण्याची गरज चळवळीतील स्त्रियांना वाटू लागली. हा केवळ ज्ञानार्जनाचा ध्यास नव्हता. परंतु नवसमाज निर्माण करायचा असेल तर नेमके काय नाकारले पाहिजे, कशाला, कोणाला विरोध केला पाहिजे याची समज निर्माण होणे महत्त्वाचे होते. सध्याच्या भांडवली समाजात सर्वसामान्य पुरुषही शोषित असतो. आणि तरीदेखील तो या बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये स्वतःसाठी थोडीशी जागा मिळवतो. तो विकृत होतो पण स्वतःला जगवतो. अशा पुरुषाबरोबर समानता मागणे म्हणजे आपणही ती विकृतता, ती स्पर्धा, ती अमानुषता स्वीकारणे असे चळवळीतील कार्यकर्त्यांना वाटत होते. नव्या समाजातील स्त्री व पुरुष हे नवीन व्यक्तिमत्त्वे धारण करतील. त्यांना लिंगसापेक्ष भूमिका घ्यावी लागणार नाही, अशी धारणा चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांची होती. यासाठीच पुरुषाच्या हाती इतकी सत्ता, ताकद केन्द्रीत झाली कशी याचा शोध घेण्यासाठी प्रामुख्याने मानववंशशास्त्राचा आधार घेऊन अभ्यास सुरू झाला.

उत्खननातून इतिहासकालीन समाजांची माहिती मिळत गेली. पुरातत्त्वशास्त्रातून जी माहिती उपलब्ध झाली, त्यावर आधारित पद्धतीने काही ठिकाणी संभावनात्मक तर्क Conjectures वापरून व तुटलेले दुवे तर्कशास्त्राने सांधून स्त्री-पुरुष संबंधांचा बदलता आलेख काढायला सुरुवात झाली. याबाबतीत सर्वांत पहिला भौतिकवादी प्रयत्न एंगलसने केला होता. त्या विचारातील त्रुटीही स्त्रीमुक्तिवादी विचारवंतांनी उघड केल्या आणि जगातील सर्व व्यवहारांच्या गाभ्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला.

अशा महत्त्वाच्या प्रयत्नांपैकी एक प्रयत्न मारिया मिएस हिचा आहे. या

लेखामध्ये प्रामुख्याने तिच्या विचारांची ओळख करून देण्याचा प्रयत्न आहे. मला स्वत:ला या विचारातील तार्किकता पटलेली आहे आणि म्हणूनच केवळ भाषांतर न करता किंवा तिच्या लेखनातील अवतरणे न देत बसता मला समजलेला तिचा विचार या पद्धतीने मी येथे मांडणी करणार आहे.

## इतिहासाकडे पाहाण्याचा भौतिकवादी दृष्टिकोन

मानवजात ही इतर प्राण्यांपेक्षा वेगळी आहे याचे महत्त्वाचे कारण इतर प्राणिमात्रांपेक्षा मानवाचे निसर्गाशी असलेले नाते वेगळे आहे. एका अर्थाने इतर प्राणिमात्रांप्रमाणेच तोही निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. परंतु दुसरीकडे मानव स्वत:ला भोवतालच्या निसर्गापासून वेगळे काढून बघू शकतो. त्याला त्याच्या ' स्व ' ची जाणीव होऊ शकते आणि तो त्याचे निसर्गाबरोबर असलेले नाते बदलू शकतो. हे नाते ' पॅसिव्ह ' राहात नाही. हे नाते द्वंद्वात्मक असते. मानवजातीचा इतिहास प्रामुख्याने नैसर्गिक द्रव्यांवर प्रक्रिया करून मानवी जीवनाच्या संगोपनासाठी त्यांचा उपयोग करणे या मूलभूत कृतीशी–म्हणजेच श्रमप्रक्रियेशी–बांधलेला आहे. निसर्गाशी मानवाचे जैविक नाते आहे. त्याच्या सर्व इतर व्यवहारांचा सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय हा पाया आहे.

हे सर्वच भौतिकवादी व मार्क्सवादी स्वीकारतात. पण मारिया मिएसचे म्हणणे असे की या श्रमप्रक्रियेमध्येसुद्धा स्त्रीची श्रमप्रक्रिया व पुरुषाची श्रमप्रक्रिया यांमध्ये फरक आहे. म्हणजेच त्यांचे निसर्गाशी असलेले नाते वेगळ्या प्रकारचे आहे. हे दोन पद्धतीने घडत असते. मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे मानवी जीवनाच्या तीन महत्त्वाच्या अवस्था असतात. एक अवस्था म्हणजे जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी वस्तूंचे ' उत्पादन ' करणे. दुसरी अवस्था म्हणजे या वस्तूंच्या उत्पादनास आवश्यक अशा साधनांचे–उपकरणांचे उत्पादन करणे व तिसरी अवस्था जीवनाचे पुनरुत्पादन करणे व रोज होणारी झीज भरून काढणे. त्याचबरोबर संततीला जन्म देऊन वंश सातत्य टिकविणे. थोडक्यात मानवजातीचा इतिहास हा ' उत्पादन आणि पुनरुत्पादन ' या प्रक्रियांतून आणि त्या निमित्ताने निर्माण होणाऱ्या सामाजिक संबंधांतून घडविला जातो. या व्यवहारामध्ये स्त्रीचा निसर्गाशी संबंध दोन्ही प्रक्रियांतून येतो. वस्तूंचे उत्पादन, त्यासाठी लागणारी साधने ती बनविते. त्याचबरोबर पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेत ती महत्त्वाचा भाग घेते. आश्चर्य म्हणजे मार्क्स व एंगल्स यांनी इतकी मूलभूत मांडणी करूनही पुढे ते म्हणतात की 'जीवनाचे उत्पादन' ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. इतकेच नव्हे तर लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीसुद्धा नैसर्गिक आहे. जणू काही ती इतर प्राणिमात्रांप्रमाणेच ' न जाणीव'पूर्वक घडत असते. त्यांच्या मते खरी श्रमविभागणी सुरू झाली ती बुद्धिजीवी व श्रमजीवी

कामाच्या निमित्ताने. त्यांच्या मते मानवी संस्कृतीला सुरुवात झाली ती अधिकाधिक साधनांचा व उपकरणांचा शोध, त्यामुळे वाढलेली उत्पादकता, अधिक वस्तू, अधिक गरजा, अधिक लोकसंख्या या क्रमाने समाज पुढे जाऊ लागला तेव्हा त्यांच्या मते स्त्री–पुरुषांमधील सहकार्य, लैंगिक संबंध, त्यातून निर्माण होणारा नवा जीव, त्यांचे संगोपन, जीवन घडविणे हे सर्व व्यवहार संस्कृतीशी निगडीत नाहीतच. ते सर्व नैसर्गिक. त्यांचा उत्पादनशक्ती वाढविण्यात काहीही सहभाग नाही.

येथेच मारिया मिएस मार्क्स व एंगलसच्या वैचारिक धाग्यातील अपुरेपणा दाखवून देते. पुरुषाने केलेले उत्पादन वाढविलेल्या उत्पादकशक्ती हे मात्र अधिकाधिक मानवीपणाची प्रचीती देणारे ठरते. मानव म्हणून त्याच्या विकासाची ती चिन्हे मानली जातात. परंतु त्याच प्रक्रियेच्या बरोबरीने जी प्रक्रिया घडत असते, जी तितक्याच जाणीवपूर्वक घडविली जाते, निसर्गाचा क्रम समजावून घेऊन, आत्मसात करून जीवन जगविण्याचा, फुलविण्याचा, जीवाला जन्म देण्याचा जो प्रयत्न केला जातो तो मात्र 'मानवी' गणला जात नाही. सुसंस्कृततेकडे जाण्याचा क्रम समजला जात नाही.

याच संदर्भात मारिया मिएसचा दुसरा मुद्दा पुढे येतो. स्त्री वेगळ्या प्रकारचे उत्पादन करून थांबत नाही. तर ते उत्पादन करण्याची तिची साधने वेगळी असतात. सर्वात पहिले साधन हे मानवी शरीर असते. अर्थात शरीर हे उत्पादनाचे साधनही असते व उपभोगाचेही साधन असते. स्त्री व पुरुष यांची शरीरे दोन्ही बाबतीत गुणात्मकतेने वेगळी आहेत आणि म्हणून दोघांचेही आपापल्या शरीराशी असलेले नातेही वेगवेगळे आहे. दोघेहीजण निसर्गाचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने करत असतात. यामुळे बाह्य निसर्गामध्ये तर बदल होत असतोच, परंतु मानवाच्या आतील निसर्गसुद्धा बदलत असतो. मानवाचे निसर्गाशी नाते हे 'प्रॅक्सिस' स्वरूपाचे आहे. कृती, चिंतन व कृती अशा रीतीने निसर्गाशी संबंध जोडला जातो.

## स्त्रीचे निसर्गाशी वैशिष्टयपूर्ण नाते

स्त्रीचे सबंध शरीर हे उत्पादक होऊ शकते. पुरुषाच्या शरीराचा काही भाग उदा., हात, डोके वगैरे उत्पादक होऊ शकते. स्त्री संततीला जन्म तर देतेच परंतु नंतर काही दिवस संततीला स्तनपानही देते. संगोपन करते. याचा अर्थ ती काम करते. स्त्रीचे काम हे केवळ अजाणता गर्भधारणा करण्याचे नव्हते. स्वतःच्या जननक्षमतेवरसुद्धा स्त्रियांनी विजय मिळविला होता: अशा तऱ्हेने निसर्गक्रमाचे ज्ञान मिळवत ते पुढच्या पिढ्यांना देऊन त्याची वृद्धी करण्याचे कामही स्त्रियांनी केले होते. याच्याच जोडीला निसर्गातील झाडे, झुडपे, प्राणी, माती, हवा, पाणी या सर्वांबद्दलच आदिमकाळातील स्त्रियांचे ज्ञान समृद्ध होते.

याच्या जोडीला जन्माला आलेले जीव जगवणे, त्यांना अन्नपाणी देऊन वाढविणे हेही काम स्त्रिया करत आल्याने सर्वांत पहिली लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी झाली ती या दोन व्यवहारांमध्ये दिसून येते. अन्न गोळा करणे हे स्त्रिया करू लागल्या आणि कधीमधी शिकार करून मांस मिळविण्याचे काम पुरुष करू लागले. मांस ही चैन होती. फळे, मुळे, दाणे, छोटे कीटक, प्राणी हे दैनंदिन आवश्यक अन्न होते.

अनेक मानववंशशास्त्रज्ञांचा निष्कर्ष असा आहे की काठीने जमीन खणून त्यामध्ये शेती करून सातत्याने अन्नधान्य, कंदमुळे निर्माण करणे हा मानवी संस्कृतीच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा होता. कारण त्यामुळे 'वाढावा' निर्माण होऊ शकला. या वाढाव्यामुळेच अन्नधान्य टिकवून ठेवणे, साठवून ठेवणे हे तंत्रज्ञान अवगत करावे लागले व मातीची मडकी, गवताच्या टोपल्या वगैरे साधने स्त्रियांनी शोधून काढली. या सर्व व्यवहारांतून एक गोष्ट लक्षात येते की स्त्रियांचे निसर्गाशी खऱ्या अर्थाने ' उत्पादक ' नाते होते. कारण त्या निसर्गक्रमाचे ज्ञान अवगत करून घेऊन ' सृजनाचे ' काम करत होत्या. त्या धान्य, कंदमुळे नुसते गोळा करत नव्हत्या तर ' निर्माण ' करत होत्या. निर्मितीच्या प्रक्रियेला हातभार लावत होत्या.

हे निसर्गाशी असलेले वस्तुनिष्ठ नाते केवळ उत्पादक नव्हते तर ते ' सामाजिक उत्पादन ' होते. स्त्रिया हे सर्व एकटच्या, स्वत:साठी करत नव्हत्या. तर सर्वांसाठी, समाजासाठी आणि मुख्य म्हणजे स्वत:च्या शरीरातून जन्माला येणाऱ्या बालकासाठी करत होत्या. हे सामाजिक परिमाण स्त्रियांच्या जीवनात सातत्याने आढळते. हे परिमाण जैविक आहे. एका निसर्गप्रक्रियेचा ते भाग आहे. म्हणून मारिया म्हणते की सर्वांत महत्त्वाचा व सर्वप्रथम निर्माण होणारा सामाजिक संबंध आई व मुले यांच्यात निर्माण होतो.

मारिया मिएस तिच्या म्हणण्याचा सारांश असा मांडते की–

१) स्त्रियांचा निसर्गाशी येणारा संबंध–स्वत:च्या अंतर्गत निसर्गाशी तसेच बाह्य निसर्गाशी–हा क्रिया–प्रतिक्रिया या पद्धतीने घडत जातो. स्वत:च्या शरीराशी त्यांचे नाते सृजनशील स्वरूपाचे असते आणि बाह्य निसर्गालाही त्या सृजनशील स्वरूपात पाहातात.

२) स्त्रिया जरी निसर्गाचा वापर करतात तरी त्या नात्यामध्ये निसर्गावर आक्रमण करून नियंत्रण मिळविण्याची कल्पना नसते. स्वत:च्या शरीराकडे मालकी हक्काच्या भावनेने त्या पाहात नाहीत. तसेच जमिनीविषयीसुद्धा मालकीहक्काची कल्पना त्यांच्याकडे नव्हती. ' सृजन होऊ दे, सृजन करू द्या ' या भावनेने त्या निसर्गाशी सहकार्याच्या भावनेने समरस होतात.

३) 'जीवनाची निर्मिती' करण्याची जबाबदारी असल्याने उपजीविकेसाठी आवश्यक उत्पादन व त्या तत्त्वावर आधारीत अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे श्रेय स्त्रियांकडे जाते. याचा अर्थ सामाजिक उत्पादन व सामाजिक संबंध या मानवी समाजाला आवश्यक घटकांची सुरुवात स्त्रियांनी केली. म्हणजेच स्त्रियांनी इतिहासाला सुरुवात केली.

## पुरुषांचे निसर्गाशी असलेले नाते

पुरुषांच्या निसर्गाशी असलेल्या नात्यालाही जीवशास्त्रीय व ऐतिहासिक अशी बैठक आहे. मारिया मिएसचा आग्रह असा आहे की पुरुष स्वतःचे पूर्ण शरीर 'उत्पादक' असल्याचा अनुभव घेऊ शकत नाही. कोणत्यातरी साधनाचा, उपकरणाचा आश्रय घेतल्याखेरीज पुरुषाचे शरीर उत्पादक दिसू शकत नाही. त्या उत्पादकतेची फळे दिसायला वेळ लागतो. म्हणूनच स्वतःच्या शरीराच्या आतील निसर्गाबद्दल, स्वतःच्या शरीराबद्दल पुरुषाच्या कल्पना इतिहासकालाप्रमाणे बदलत गेलेल्या आढळतात. तो श्रमप्रक्रियेत कोणत्या प्रकारची साधने वापरतो ह्यावर ते अवलंबून असलेले दिसते. 'मानव' म्हणून जगणे म्हणजे तंत्रज्ञान अवगत करणे अशी त्याची 'स्व-प्रतिमा' दिसते.

याच ओघामध्ये पुरुष बाह्य निसर्गाशी असलेले नाते अभिव्यक्त करण्यासाठी चिन्हांचा वापर करू लागला. आश्चर्य म्हणजे हात हे श्रमप्रक्रियेतील पहिले महत्त्वाचे साधन होय. परंतु असे दिसते की स्वतःची 'उत्पादकता' सिद्ध करण्यासाठी 'लिंगाचा' निर्देश करणे पुरुषाला अधिक सयुक्तिक वाटले. स्त्रिया काठीने जमीन उकरून शेती करत असत. ते जाऊन नांगराच्या फाळाचा शोध लागून शेती नांगरण्याची पद्धती सुरू झाली. त्या सुमाराला 'लिंग' या चिन्हाला महत्त्व आलेले दिसते. भारतीय भाषांतून नांगर व लिंग यातील साम्यदर्शक शब्द पुष्कळ सापडतात. उदा० लिंगाला यंत्र शब्दप्रयोग केलेला आढळतो. काम शब्दप्रयोग श्रम व कामभावना यासाठी वापरलेला आढळतो. थोडक्यात स्त्री हा बाह्य निसर्गाचा भाग असून बाह्य निसर्गाशी असलेले 'साधनमय' नाते स्त्रीशीही जोडण्याचा प्रयत्न दिसतो. वीर्य व बी, भूमी व स्त्री यासाठी समान शब्द वापरले जाणे हेही सूचक आहे.

या नात्यातून असाही अर्थ निघतो की स्त्रीचे 'असणे', स्त्रीचे जीवनव्यापार, व्यवहार हे पुरुषांच्या उत्पादकतेसाठी आवश्यक वस्तुस्थिती अशा रितीने गृहीत धरले गेले होते. या पुरुषाची स्त्रीवरील वर्चस्वाची भावना तयार होऊ लागली होती. मारिया मिएस भारतीय तत्त्वज्ञानाच्या उपशाखांमधून जे वैचारिक युद्ध

लढविले गेले त्याचा दाखला देते व म्हणते की स्त्रीच्या उत्पादकतेला जे दुय्यम स्थान मिळाले ते सहजासहजी घडले नसावे. जमीन, गाईगुरे आणि स्त्रिया यांच्या-वर अधिकार प्रस्थापित करण्यासाठी जो वर्गसंघर्ष झाला असेल त्याचेच पडसाद या वैचारीक संघर्षातून दृष्टीस पडतात. मूल कोणाचे–ज्या जमिनीत बीज पडले त्या जमिनीचे, त्या जमीनमालकाचे की ज्याचे बीज होते त्याचे स्वतःचे, या प्रकारचे वाद तत्त्वज्ञानातून उपस्थित झाले होते. हे स्त्रियांच्या व त्यांना होणाऱ्या मुलांच्या संदर्भात होते.

या सर्व प्रक्रियेचे फळ असे दिसले की पुरुषांनी त्यांचे स्वतःचे शरीर हे अधिक उत्पादक आहे अशी धारणा करून घेतली. स्त्रीची उत्पादकता दुय्यम मानली आणि स्त्रिया व बाह्य निसर्ग यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करून मालकी-हक्काच्या कल्पनेला पुढे आणले. या प्रक्रियेत तंत्रज्ञानाला खूप महत्त्व दिले गेले. जणू मानवाची उत्पादकता व मानवीपणा हा अधिकाधिक तंत्रज्ञान हस्तगत करण्यानेच सार्थ होतो असे समीकरण यातून पुढे आले.

या विश्लेषणातून मारिया मिएस महत्त्वाचा निष्कर्ष काढते की जर उत्पा-दकता या शब्दाचा व्यापक अर्थ लक्षात ठेवला की, मानवी जीवनाच्या इतिहासा-मध्ये मानवी जीवनाची पुन्हा पुन्हा नव्याने निर्मिती करावी लागते, त्यासाठी आवश्यक क्षमता–तर असे म्हणता येईल की स्त्रीच्या उत्पादक क्षमतेच्या पायावरच पुरुषाची उत्पादक क्षमता कार्यरत असलेली आढळून येते. जगातील सर्व महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना स्त्रीच्या या सामर्थ्याच्या पायावर उभ्या राहूनच घडू शकल्या.

## एक कल्पित : शिकारी पुरुष हाच ‘कर्ता’

डार्विनच्या सिद्धान्तावर विश्वास ठेवून समाजशास्त्रीय सिद्धान्त बांधू बघणाऱ्या समाजशास्त्रज्ञांनी नेहमीच ‘शिकारी पुरुष’ ही समाजबांधणीसाठी पायभूत कल्पना मानली. परंतु पुरुष जेव्हा शिकारी होता त्याचवेळी स्त्रिया ‘फळे, कंदमुळे, गवताचे बी’ गोळा करत होत्या. आणि त्या स्थितीमध्ये सुद्धा समाजाच्या एकूण गरजांपैकी ८० टक्के गरजा स्त्रियांकडून भागविल्या जात होत्या. शिकार ही नेहमी मिळत नसे. ती चैन असे–असे गूडेल म्हणतो; दैनंदिन जगण्यासाठी समाज स्त्रियांच्या कामावर अवलंबून होता. अनेक मानववंशशास्त्रज्ञांनी हे सिद्ध केले आहे. मार्टिन व वूहरीज यांनी मुर्डाक्स एथ्नोग्राफीक ॲटलासमधील माहितीच्या आधारे असा निष्कर्ष काढला आहे की एकूण उपजीविकेपैकी ५८ टक्के हे कंदमुळे वगैरे गोळा करण्याच्या प्रक्रियेमधून मिळत असे. २५ टक्के शिकारीतून व उरलेले गोळा करणे व शिकार या दोन्ही प्रक्रिया एकदम केल्या जाऊन मिळत असे.

लिकॉक म्हणते की शिकारीच्या मोहिमेसाठी जाताना स्त्रिया त्यांना अन्नधान्य बांधून देत असत. स्त्रियांनी जर दैनंदिन उपजीविका पुरविली नसती तर शिकारीची साहसे करणे शक्य झाले नसते.

अशी वस्तुस्थिती असूनही पुरुष–शिकारी हा ‘कर्ता’ होता हे गृहीतकृत्य सर्वच समाजशास्त्रज्ञांनी गृहीत धरले. आणि सर्वात पहिली हत्यारे, व साधने पुरुषांनी बनविली. उपजीविकेची सोय केली, समाजाच्या बांधणीचा पाया घातला, स्त्रिया व मुलांना संरक्षण दिले अशा प्रकारचे समाजाच्या उभारणीचे चित्र रेखाटले गेले. याच मांडणीवर आधारीत अनेक सिद्धान्त पुढे आले. लिओनेल टायगर व रॉबिन फॉक्स यांच्या मते मानवाच्या विकासाला ‘शिकारी’च्या शोधामुळे गती मिळाली. त्यांच्या मते केवळ साधनांच्या शोधाचे श्रेय पुरुषाला देता येत नाही तर दोन पायांवर ताठ उभे राहाणे, आणि हातांचा वापर अस्त्र फेकण्यासाठी करणे, ही फार महत्वाची घटना होती. त्यांच्या मते या काळी स्त्रीशी लैंगिक व्यवहार करण्याच्या निमित्ताने पुरुषांमध्ये आपापसात फार मोठी स्पर्धा होत होती. त्यामुळे लढाया, भांडणे होत असत. तेव्हा या एकमेकांशी झगडणाऱ्या पुरुषांमधील आक्रमकतेला आवर घालून त्यांचे सख्य घडवून आणणे, किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे ही काळाची गरज होती. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे नीतिनियम, रितीरिवाज निर्माण करणे गरजेचे होते. त्यातूनच उतरंडीची रचना निर्माण करण्यात आली. ह्या सर्वांचे श्रेय ‘कर्त्या’ पुरुषांकडे जाते. या शास्त्रज्ञांच्या मते मानवाच्या सांस्कृतिक प्रगतीच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा हा ‘बलात्काराकडून’ ‘शांततापूर्ण पद्धतीने स्त्रियांची देवाणघेवाण’ हा आहे. पुरुषांचे स्त्रियांवर वर्चस्व असणे, ही त्यांना नैसर्गिक, जीवशास्त्रीय घटना वाटते. त्याचबरोबर सर्व पुरुष मिळून स्त्रियांवर वर्चस्व कसे ठेवू शकले असावेत, या घटनेबद्दल त्यांचे स्पष्टीकरण असे–पुरुष शिकारीला जात असल्यामुळे, एकत्रित आखणी करीत असल्यामुळे त्यांच्यात ‘आपलेपणाची भावना’ समरसतेची भावना निर्माण होणे शक्य होते. त्यातून एकी निर्माण झाली. स्त्रियांवर वर्चस्व स्थापले गेले. आणि समाज घडविला जाऊ लागला. त्यांच्या मते स्त्री पुरुषापुरुषांमधील आकर्षण-आत्मीयता ही समाजाच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक होती, तशीच पुरुषापुरुषांमधील आत्मीयता व सहकार्य हे समाजाच्या उत्पादन गरजांसाठी आवश्यक अट होती. आश्चर्य म्हणजे मार्क्सवाद्यांनीही आजपर्यन्त या सैद्धान्तिक चौकटीचा धिक्कार केलेला नाही किंवा तिची चिकित्सा केलेली नाही.

मारिया मिएसच्या मते सध्याच्या आधुनिक, भांडवली, साम्राज्यवादी, लिंगश्रेष्ठत्वावर आधारित दृष्टिकोनातून ह्या सिद्धान्ताची मांडणी झालेली आहे, एवढेच नव्हे तर त्या काळातील नवजात अशा मानवी समाजावर सध्याच्या मूल्य-

व्यवस्थेचे केलेले हे 'आरोपण' आहे. अशा प्रकारच्या मांडणीमुळे सध्याच्या शोषणयुक्त व्यवस्थेचे समर्थन करणे सहज शक्य होते. स्त्रीपुरुषांमधील लिंगसापेक्ष-शोषण, वर्गीय शोषण, देशादेशांमधील शोषण हे सर्व कालातीत व नैसर्गिक आहे असे दाखविता येते. म्हणूनच या मांडणीला वंशवादाचा, फॅसिझमचा, हुकुमशाहीचा वास आहे, असे एव्हलीन रीड म्हणते.

## स्त्रियांची 'साधने' पुरुषांची 'साधने'

ऐतिहासिक श्रमांची विभागणी लिंगसापेक्ष पद्धतीने झालेली दिसते. त्यामुळे आपापल्या उत्पादनपद्धतीला अनुकूल अशी साधने स्त्री पुरुषांनी तयार केलेली दिसतात, त्यांपैकी स्त्रियांची साधने ही दैनंदिन उपजीविकेसाठी आवश्यक उत्पादना-साठी निर्माण केली गेली. आणि ती खऱ्या अर्थाने उत्पादक ठरली गेली. परंतु पुरुषांनी 'शिकारीसाठी' जी साधने निर्माण केली ती मूलतः संहारासाठी उपयोगी पडणारी ठरली. आश्चर्य म्हणजे आजपर्यंत समाजशास्त्रज्ञांनी स्त्रियांच्या साधनांची खास दखल घेतली नाही. पुरुषांच्या कल्पकतेचे, शोधप्रवृत्तीचे कौतुक केले गेले. स्त्रियांची प्राथमिक हत्यारे म्हणजे जमीन खणण्यासाठी काठी, खुरपे, गवताची टोपली वगैरे म्हणता येतील. याउलट पुरुषाची हत्यारे म्हणजे अणकुचीदार दगड, भाला, धनुष्य बाण वगैरे, इतर कोणात्याही उत्पादक प्रक्रियेसाठी वापरता येत नव्हती. मारियाच्या मते साधनांमधील हा फरक फार महत्त्वाचा ठरला आणि या साधनांच्या जोरावरच शोषणाधिष्ठित समाजाला सुरुवात झाली. ती आग्रहपूर्वक विधान करते की, शिकारीला सुरुवात होणे म्हणजे आर्थिक विकासाला, उत्पादनाला सुरुवात होणे असे जे अनेक सैद्धान्तिक मानतात ते खोटे आहे. शिकारीमुळे मानवाचे पुरुषांचे—निसर्गाशी असलेले नाते (ऑब्जेक्ट रिलेशन्स) बदलले. किंबहुना नव्या पायावर त्याची उभारणी झाली. हे नाते सहकार्यावर, गतीनियम समजून घेऊन ते ओलांडण्यावर अवलंबून न राहाता, निसर्गावर आक्रमण करून, ओरबाडून बळजबरी करून वर्चस्वाच्या पायावर उभारले गेले. हे नाते परस्पर सामंजस्य, देवाणघेवाण, एकदुसऱ्याचा विकास या तत्त्वांपासून फार दूर गेले.

आयुधांच्या जोरावर वर्चस्व प्रस्थापित करण्याची प्रक्रिया केवळ झाडेझुडपे-फळे, फुले, प्राणी यापुरतीच मर्यादित राहिली नाही तर आयुधांचा वापर करून स्त्रियांवरही बळजबरी केली जाऊ लागली. सगळ्यात प्रथम 'खाजगी संपत्तीचा' जो उगम झाला त्यामध्ये केवळ गुरेढोरे नसावीत पण स्त्रियांनाही पळविले जाऊन गुलाम करणे सुरू झाले असावे असे मिआसूँ व बोर्नेमन यांनी म्हटले आहे.

या ठिकाणी मारिया मिएस स्पष्टीकरण असे देते की, 'येथे तंत्रज्ञानाला केवळ दोष देऊन चालणार नाही.' तंत्रज्ञान सजीव नसते. विचार करू शकत नाही

तत्कालिन शिकार करणाऱ्या समाजाचा जो अभ्यास झाला आहे त्यामध्ये दिसून येते की ही मंडळी शांतीने जगणारी होती. त्यांचा स्वभाव आक्रमक नव्हता, एवढेच नव्हे तर ज्यांना ठार करायचे त्या प्राण्यांबद्दल त्यांना अनुकंपा असे. म्हणूनच मारिया मिएस म्हणते की अशा प्रकारचे तंत्रज्ञान एक प्रकारची संधी, शक्यता निर्माण करते. जोपर्यन्त मर्यादित पद्धतीने शिकारीचा व कंदमुळे गोळा करण्याच्या प्रक्रियेचा वापर चालू होता, तोपर्यंत निसर्गाबरोबरील नाते हे वर्चस्वाचे व शोषणाचे नव्हते.

जेव्हा भटकणाऱ्या टोळ्या आयुधांचा वापर करून प्राण्यांना पकडणे व माणसाळविणे, त्यांची पैदास करणे या प्रक्रियेला लागल्या तेव्हा त्यांच्याकडील उत्पादक (संहारक) शक्ती वाढल्या. त्यांनी शेती करून स्थिरावू पाहाणाऱ्या वस्त्यांवर, टोळ्यांवर हल्ले करण्यास सुरुवात केली, या ठिकाणी पुन्हा मारिया मिएस हे निदर्शनास आणते की शेती करणे हे खरे उत्पादक काम होते, ते कोणीतरी करत होते. त्यांच्यावर हल्ले करून त्यांना गुलाम करणे, त्यांनी उत्पादन केलेले अन्नधान्य काढून घेणे हे शक्य झाले. तथाकथित वाढत्या उत्पादनशक्ती म्हणजे आक्रमणाच्या संहाराच्या शक्ती आहेत आणि त्या खऱ्या उत्पादन शक्तीच्या पायावरच फोफावतात.

एलिझाबेथ फिशरने प्राण्यांच्या पैदाशीच्या तंत्रज्ञानाला खूप महत्त्व दिले आहे. त्यामुळे पुरुषाला स्वतःच्या जननक्षमतेचे भान झाले, माहिती झाली. त्याचा उपयोग पकडलेल्या स्त्रियांना माणसाळवण्यात, जबरदस्तीने त्यांच्याशी संभोग करून प्रजोत्पादनासाठी होऊ लागला असावा असे तिला वाटते. त्यातूनच पुरुषाच्या नावे वंश चालवणे, पुरुषी सत्ता प्रस्थापित होणे, जनानखाने निर्माण करणे वगैरे पुरुषप्रधान व्यवस्थेला सुरुवात झाली असावी. यातूनच स्त्रियासुद्धा संपत्ती म्हणून गणल्या जाऊ लागल्या, त्यांच्यावर खाजगी मालकी सांगता येऊ लागली आणि एका नव्या ‘ उत्पादनव्यवस्थेला ’ सुरुवात झाली असावी.

थोडक्यात मारिया मिएस या निष्कर्षाला येऊन पोचते की नवीन उत्पादनव्यवस्था शक्य झाली याला सर्वांत दोन महत्वाच्या घटना कारणीभूत आहेत : पुरुषांच्या हाती आयुधे व शस्त्रे यांचे केन्द्रीकरण होणे व प्राण्यांच्या पुनरुत्पादनाच्या निरीक्षणाची संधी मिळणे.

याचा अर्थ केवळ गुरे पाळणाऱ्या भटक्या जमातींमध्येच केवळ पुरुषी सत्तेला सुरुवात झाली असे नाही. शेती करणाऱ्या समाजातही स्त्रियांवर पुरुषांचे वर्चस्व हळू हळू स्थापन होत गेलेले दिसते. इस्थर बोसरूपच्या म्हणण्याप्रमाणे नांगराच्या फाळाचा शोध ही महत्त्वाची घटना होती. ज्यामुळे जमीन खोलवर खणली जाऊन

बी चांगले रुजू लागले व कणसांवर भरदार दाणे भरू लागले. उत्पादकता वाढली. परंतु मारिया मिएस दाखवून देते की मिआसूंने केलेल्या आफ्रिका खंडातील अनेक जमातींच्या पाहाणीप्रमाणे खुरप्याने केलेल्या शेतीव्यवस्थेतसुद्धा म्हातारे पुरुष अनेक स्त्रियांशी विवाह करत व त्यायोगे संपत्ती जमा करीत आणि जमातींमध्ये सत्ता संपादन करीत. मिआसूंच्या अभ्यासाप्रमाणे असे दिसते की या जमातींमध्ये शिकारीला जाण्याची पद्धती दिसते. परंतु या शिकारी अन्न मिळविण्यासाठी, उपजीविकेसाठी नसून प्रामुख्याने मनोरंजन व राजकीय स्पर्धा यासाठी केल्या जात. अशावेळी स्त्रिया व तरुण मुले यांनाही पळविले जाई. गुलामांच्या विक्री–खरेदीचे व्यवहार नंतर सुरू झाले असावेत. प्रथमतः त्यांना पकडून माणसाळविणे आवश्यक होते. प्रथमतः ही पळवून आणलेली माणसे जमातीच्या ताब्यात असत. पुढे पुढे ती खाजगीरित्या पाळली जाऊ लागली असावीत. गुलामीच्या या व्यवस्थेमुळे अर्थ व्यवस्थाही वाढू लागली. ‘ वाढावा ’ तयार होऊ लागला. म्हणजेच काही लोकांना खऱ्या अर्थाचे उत्पादक काम न करता बसून खाता येऊ लागले.

मारिया मिएस अनेक अभ्यासांतील उदाहरणे देऊन सांगते की या ‘ रानटी ’ अवस्थेतील अनेक टोळयांच्या पुरुषांच्या मुलाखतीतून त्यांचा उत्पादक शक्तीकडे पाहाण्याचा दृष्टिकोन दिसून येतो. “ खरी उत्पादकता ही धान्य उगविणे, जमीन कसणे यात नसून धनुष्यबाण चालविता येणे यात आहे. कारण त्यांच्या जोरावर तुम्हाला मध मिळू शकतो, दाणे, आक्रोड वगैरे सुकामेवा मिळतो, बायका मिळविता येतात, त्या मुले देतात, कुटुंब बांधता येते.”

अशा अनेक उदाहरणांवरून मारिया मिएस म्हणते की पुरुषांचा दृष्टिकोन अशा रीतीने ‘ वापर ’ करणे या पद्धतीचा निर्माण झाला. आणि हा ‘ वापर ’ करण्यासाठी जे प्रत्यक्ष ‘ उत्पादन ’ आवश्यक होते ते स्त्रिया करू लागल्या. निर्माण झालेल्या वस्तूंचा ताबा घेणे, वापरणे हे अनुत्पादक काम होते, परंतु त्यातूनच ‘ वाढावा ’ निर्माण होऊ शकला. ‘ वाढावा ’ म्हणजे समाजाच्या गरजेहून अधिक निर्माण झालेल्या वस्तू, असे समजले जाते. परंतु हे खरे नसून जे उत्पादन शस्त्रांच्या जोरावर, बळाचा वापर करून पळविले गेले, लुटले गेले, साठविले गेले, तेच ‘ वाढावा ’ म्हणून पाहिले गेले. त्याच वाढाव्याच्या जोरावर समाजाचा विकास होऊ शकतो, असे मानले गेले व सिद्धांत तयार झाले.

येथेच मारिया मिएस, मार्क्स व एंगल्स यांच्या विचारातील अपुरेपणा, ‘ ब्लाइंड स्पॉट ’ दाखवून देते. मार्क्सने जो समाजाच्या विकासाचा सिद्धांत पुढे मांडला त्यामध्ये ‘ वाढावा ’ निर्माण झाल्यामुळे शोषणावर आधारीत वर्गसमाजाची उभारणी, निर्मिती होऊ शकली, अशी कारणमीमांसा केलेली आहे. परंतु हा

'वाढावा 'च मुळात कसा निर्माण होतो याची चर्चा मार्क्स, एंगल्स करीत नाहीत. त्यांनी सरळ असे गृहीत धरले की, हा वाढावा उत्पादकशक्ती वाढल्यामुळे तयार होतो. म्हणजेच तंत्रज्ञान वाढल्याने तयार होतो. मारिया मिएस म्हणते, की तंत्रज्ञान वाढले–पण कोणत्या प्रकारचे–उत्पादक की संहारक? तिच्या मते 'वाढावा' ही कल्पनाच मूळात आर्थिक असू शकत नाही. ही सांस्कृतिक व खरे म्हणजे राजकीय कल्पना आहे. कारण 'गरजेच्या वस्तू' काय व 'वाढावा' काय हे समाजानेच ठरवावे लागते. हा 'वाढावा' आजवर्यंत तरी सर्वांनी एकत्र बसून निर्णय घेऊन बाजूला काढलेला नाही. तो काहींना त्यांच्या 'गरजा' नाकारून लादला गेला आहे.

याच्यापुढे जाऊन मारिया मिएस 'शोषण' ही संकल्पना मार्क्सने ज्या पद्धतीने मांडली त्यालाही आव्हान देते. ती म्हणते की शोषण म्हणजे केवळ 'समाजातील वाढावा' काही लोकांनी आपल्या हातात घेणे नव्हे किंवा आर्थिक उत्पादन प्रक्रियेचा भाग म्हणून जे घडते तेच तेवढे शोषण नव्हे. शोषण म्हणजे लूट, चोरी, इतकेच नव्हे तर दुसऱ्या समाजाच्या गरजेच्या वस्तूही पळवून आणणे, त्याला वंचित करणे म्हणजेही शोषण आहे.

तिच्या म्हणण्याप्रमाणे, एकदा उत्पादक, उत्पादकशक्ती, शोषण वगैरे संकल्पनांच्या सोयिस्कर व्याख्या केल्या गेल्या की खरे उत्पादन करणारे श्रमिक हा 'निसर्गाचा भागच' बनतात. नैसर्गिक प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या वस्तू अशा रीतीने उत्पादनाकडे पाहिले जाते आणि त्या वस्तूंचा, श्रमांचा वापर म्हणजे शोषण आहे, हे समजून घेणे टाळता येते. स्त्रियांच्या बाबतीत हे विशेषतः घडले आहे. मुलांना जन्म देणे नैसर्गिक, मुलांचे संगोपन नैसर्गिक, अशा रीतीने स्त्रियांच्या कामाचे महत्त्व, मूल्य सामाजिकदृष्टया कमी बनत गेले.

मारिया मिएसच्या मते 'पुरुषप्रधान' विचारधारेचे हे महत्त्वाचे वैशिष्ठ्य आहे. म्हणूनच ती म्हणते, की युरोपमध्ये जेव्हा आपण मानवी संस्कृतीचा विकास झाला म्हणतो तेव्हा तो विकास नसून 'चोर लुटारू' संस्कृतीचा उदय असतो, युरोपियन लोकांनी आफ्रिकेवर स्वाऱ्या केल्या. वसाहती वसविल्या, आफ्रिकन टोळ्या युरोपवर चाल करून आल्या नाहीत. ज्यांना रानटी म्हटले जाते ते खरे रानटी नाहीत, अधिक सुसंस्कृत होते. आणि विकसित लोक 'रानटी' होते. आक्रमक होते. शोषक होते.

म्हणूनच ती म्हणते, आजपर्यंत विद्वान मानत आले की इतिहास हा हळूहळू विकसित होत जाणाऱ्या मानवी समाजाच्या अवस्थांचा नकाशा आहे. आलेख

आहे. मार्क्सनेही दाखवून दिले की 'प्राथमिक साम्यवाद', रानटी अवस्था, गुलामगिरी, सामंतशाही, भांडवली अवस्था, समाजवाद व अखेर साम्यवाद या पद्धतीने मानवी समाज विकासाच्या दिशेने चालत असतो. या सिद्धान्तातील पायाभूत संकल्पनाच चुकीच्या आहेत. 'विकास' म्हणजे काय या कल्पनेचाच ऊहापोह होणे आवश्यक आहे.

## सामंतशाही, भांडवलशाही व 'शिकारी पुरुष'

मारिया मिएसच्या मते 'शिकारी पुरुष' या संकल्पनेचा व वस्तुस्थितीचा खरा पूर्ण विकास हा सामंतशाही व भांडवलशाही या दोन अवस्थांमध्ये पाहायला मिळतो. लिंगभेदावर आधारीत श्रमाची विभागणी येथे अधिकाधिक खोलवर गेलेली दिसते.

मारिया मिएसचा मुख्य सिद्धान्त असा आहे की सध्याच्या काळामध्ये खरे पाहाता 'अहिंसक' पद्धतीने शोषण चाललेले दिसते. ही प्रक्रिया छुपी असते. याचा अर्थ शोषणाचे 'रूप' बदलले आहे परंतु 'गाभा' बदललेला नाही. या अर्थ-व्यवस्थेचा जो गाभा, ज्यामध्ये वस्तू, वस्तूंचे उत्पादक व उत्पादक साधने, या तिन्हींचे शोषण होत असते. रूप बदलल्यामुळे प्रगतीचा, विकासाचा आभास तयार होतो. परंतु एका बाजूने दबली गेलेली ती प्रक्रिया दुसरीकडे दुसऱ्या रूपात वर येते.

याचे स्पष्टीकरण देण्यासाठी मारिया मिएस वसाहतवादाचा दाखला देते. एकीकडे युरोपमधील कामगाराला चांगला पगार मिळत गेला, सवलती मिळत गेल्या. कारण दुसरीकडे वसाहतीमधील शेतकऱ्यांची, स्त्रियांची, कामगारांची लूट चालली होती. शोषण चालले होते. ती आग्रहपूर्वक मांडते की कुळ व जमीनदार नाते, वेठबिगार कामगार व जमीनदार नाते जाऊन भांडवलशाहीतील ग्राहक–मजूर करारात्मक नाते जे तयार झाले, हे जे स्थित्यंतर घडले हे आपोआप घडलेले नाही. खूप मोठ्या प्रमाणावर हिंसा होऊनच हा बदल घडून आला. भांडवलशाहीचा विकासच मुळी वसाहतवाद व नववसाहतवादावर अवलंबून राहिला आहे. या हिंसक मार्गानेच काही देशांच्या अर्थव्यवस्था 'टेक ऑफ' उड्डाणाच्या अवस्थेला पोचलेल्या आहेत.

वसाहतवाद या कल्पनेचा मारिया मिएस विकास करते व सांगते की, वसाहत ही केवळ भौगोलिक संकल्पना नाही. कामगार पुरुषही स्वत:च्या स्त्रियांचा वसाहतीसारखा वापर करतात. 'वसाहत' या कल्पनेमध्ये 'नैसर्गिक' 'आपोआप' ही संकल्पना सामावलेली आहे. आणि ही व्याख्या पुरुषप्रधान विचारधारेचे प्रमुख

लक्षण आहे. या व्याख्येमुळे हिंसेचे, शोषणाचे समर्थन होऊ शकते. विवाह, कुटुंब या संकल्पनांनी पुरुष आपापसात सीमारेषा आखून घेतात, आणि त्या आतील 'निसर्गावर'–स्त्रीशरीरावर, तिच्या श्रमांवर, जननशक्तीवर, लैंगिकतेवर त्यांचा प्रत्यक्ष अधिकार चालू शकतो.

वसाहतवादाचे दुसरे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे वसाहतीतील व्यक्ती स्वतःची संस्कृती, स्वतःचे अस्तित्व तुच्छ लेखू लागतात. त्या राज्यकर्त्यांच्या नजरेतून स्वतःकडे पाहू लागतात पुरुषी नजरेतून स्वतःच्या अस्तित्वाचा अर्थ आकलन करू लागतात.

वसाहतवादाच्या कल्पनेचा विकास करत मारिया मिएस आजच्या आंतर-राष्ट्रीय संबंधांवर आधारित अर्थव्यवस्थेकडे लक्ष देते. आणि ही अर्थव्यवस्था लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी अधिकाधिक दृढ कशी करते, तिचा वापर करून अधिक शोषण कशी करते याचे विवेचन करते. तिच्या मांडणीप्रमाणे आजच्या अर्थव्यवस्थेचा विचार करताना जागतिक पातळीवरच तिचे आकलन केले पाहिजे व विरोधही त्या पातळीवर करावा लागेल. स्त्रीच्या दास्याचा विचार हा भौतिक, दैहिक पायाच्या संदर्भात करीतच, मग तिच्या वासाहतिक मनोव्यवस्थे-कडे बघता येणे शक्य होईल. तिच्या मनाचे कापलेले पंख पुन्हा वाढू द्यायचे असतील तर या समाजाच्या आर्थिक रचनेचा पाया तर बदलावा लागेलच, परंतु आर्थिक पायाचे समर्थन करणारी विचारधारा, संकल्पना याही तपासून पाहून त्यांना आव्हान द्यावे लागेल. मारिया मिएसने केलेला हा प्रयत्न निश्चित दिशा दाख-विणारा आहे.

७, मंजिरी, मकरंद सहनिवास
वीर सावरकर मार्ग, मुंबई ४०००१६

छाया दातार

### संदर्भ

Patriarchy and Accumulation of Capital on World Scale;
by Zed Books Ltd. London, 1986.

# परामर्श

## वाचकांना आवाहन

परामर्श हे पुणे विद्यापीठ तत्त्वज्ञान विभागातर्फे चालविले जाणारे तत्त्वज्ञान-विषयक त्रैमासिक असून ते गेली दहा वर्षे अव्याहतपणे चालविले गेले आहे. आता परामर्शचे ११ वे वर्ष सुरू झाले आहे. आजवर तत्त्वज्ञानातल्या तांत्रिक विषयांवर, तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी व प्राध्यापक यांना उपयुक्त ठरणाऱ्या विषयांवर तर 'परामर्श' मध्ये अनेक अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध झालेच पण त्याचबरोबर सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा अनेक विषयांवर तात्त्विक-वैचारिक स्वरूपाचे लिखाणही परामर्शमधून सातत्याने प्रकाशित झाले आहे. आजवर 'परामर्श 'ने विशिष्ट विषयांना वाहिलेले अनेक विशेषांकही प्रसिद्ध झाले आहेत. विशेषांकांचे काही विषय असे : १) विटगेन्स्टाइनचे तत्त्वज्ञान. २) कार्ल मार्क्सचा विचार. ३) मार्क्स आणि भारतीय विचारवंत (भाग १ व २). ४) विज्ञानाचे तत्त्वज्ञान (भाग १ व २). ५) सांख्यदर्शन ६) स्त्रीमुक्ती : समस्या व दिशा.

परामर्शच्या आजवरच्या अंकांच्या व विशेषांकांच्या काही प्रती उपलब्ध आहेत. ते अंक (पूर्वी मिळाले नसल्यास) परामर्शच्या आजीवन वर्गणीदारांना ५० रु. अधिक भरल्यास मिळू शकतील. परामर्शच्या वाचकांनी–जे आजीव वर्गणीदार नसतील अशांनी–आजीव वर्गणी रु. २५० + ५० (जुन्या अंकांसाठी) = एकूण रु. ३०० भरून या सवलत योजनेचा लाभ घ्यावा.

परामर्शचे जे आजीव वर्गणीदार असूनही ज्यांना पूर्वीचे अंक मिळाले नसतील त्यांनी कोठपर्यंतचे अंक मिळाले नाहीत त्याचा तपशील कळवावा. त्यांनाही सवलतीच्या दरात जुने अंक मिळू शकतील.

परामर्श प्रकाशनातर्फे विविध पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. 'परामर्श'च्या आजीव वर्गणीदारांना परामर्श प्रकाशने सरसकट चाळीस टक्के सवलतीच्या दराने मिळतील.

ही सवलत अंक व पुस्तके शिल्लक असेपर्यंतच राहील.

'परामर्श' चे आपण आजीव वर्गणीदार झाल्याने आपला तर फायदा आहेच, पण त्यामुळे 'परामर्श' ला आर्थिक स्थैर्य येण्यासही उपयोग होणार आहे.

आपला स्नेहांकित

**प्रदीप गोखले**

(कार्यकारी संपादक)